## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेशपूर्व (पेट) परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी दि. १३ सप्टेंबर रोजी ५०९ विद्यार्थ्यांनी पेट परीक्षा दिली. यावेळी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी परीक्षा केंद्रास भेट देवून समाधान व्यक्त केले

विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेच्या इमारतीजवळ ऑनलाईन परीक्षा केंद्रात दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजेपासून ही परीक्षा सुरु झाली. भौतिकशास्त्र विषयासाठी २४२ पैकी १३०, प्राणीशास्त्र विषयासाठी १५५ पैकी १०६, इलेक्ट्रॉनिक्स विषयासाठी १५ पैकी ८, गणित विषयासाठी २११ पैकी १०९, वनस्पतीशास्त्र विषयासाठी ११३ पैकी ९४, भूगोल विषयासाठी ८० पैकी ५० तर संख्याशास्त्र विषयासाठी २२ पैकी १२ विद्यार्थ्यांनी पेट परीक्षा दिली. परीक्षा कालावधीत एकाही विद्यार्थ्याला तांत्रिक अडचणी निर्माण झाली नाही. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी बुधवारी परीक्षा केंद्राला भेट देवून पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत कुलसचिव डॉ. विनोद पाटील, केंद्र प्रमुख प्रा.एस.आर. चौधरी उपस्थित होते. दुपारी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांनी देखील परीक्षा केंद्राला भेट दिली. या परीक्षांसाठी समन्वयक म्हणून प्रा. मनोज पाटील तर तांत्रिक सहाय्य करीता प्रणाली विश्लेषक दाऊदी हुसेन व प्रा. सुरेश कापसे हे काम पाहत आहेत. अशी माहिती संशोधन विभागाचे सहायक कुलसचिव डॉ. देवेंद्र जगताप यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत गेल्या आठवडाभर सुरु असलेल्या प्रवर्तन व विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमाचा समारोप मानसोपचारतज्ञ डॉ. कांचन नारखेडे यांच्या उपस्थितीत झाला.

एक आठवडा या उपक्रमात विविध वक्त्यांना पाचारण करून विद्यार्थ्यांशी त्यांच्या संवाद घडवून आणला. डॉ. कांचन नारखेडे यांनी ताण तणाव का येतो? आणि आलेला ताण दूर करण्यासाठीची काही सूत्रे सांगितली. समुपदेशन डॉ. ज्योती पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. रमेश सरदार, डॉ. पवित्रा पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. अतुल बारेकर यांनी या उपक्रमांचा आढावा घेतला.

**बातमी नं. ३**

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण आणि भूशास्त्र प्रशाळेतील उपयोजित भूविज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. एस.एन.पाटील यांची "एससोसिएशन ऑफ जिऑलॉजिस्ट अँड हैड्रोजिओलॉजीस्टस (जिओफोरम) महाराष्ट्र" चे उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे.

ही संघटना व्यावसायिक आणि वैज्ञानिक मंच आहे ज्यामध्ये भूविज्ञान, अभियांत्रिकी भूविज्ञान आणि भूजल क्षेत्रातील तज्ञांचा समावेश आहे. डॉ. पाटील यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्यामुळे खानदेशातून जिओफोरमचे पहिले उपाध्यक्ष होण्याचा मान त्याना प्राप्त झाला आहे ते इंडियन सोसायटी ऑफ इंजिनिअरींग जिऑलॉजीचे कार्यकारी परिषद सदस्य म्हणून काम पाहत आहेत. भूशास्त्र विषयात गेल्या ३३ वर्षापासून संशोधन आणि अध्यापनाचे काम ते करीत आहे. त्यांच्या निवडीबद्दल कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १३ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी